# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२५/०७/२०१६.

**१) मोटार पंपची चोरी. :—**

दिनांक २३/०७/२०१६ रोजी १८.०० ते २४/०७/२०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील फिर्यादी मनोज शशीकांत गोयका वय ३७ वर्ष, रा. पवनारखारी हे नव्याने तयार होत असलेल्या डोंगरी माईन्स वसाहत चानमारा रोड येथील काम ठेक्याने घेतले असुन तेथे कामात लावण्यात आलेली २ एचपीची किर्लोसकर कंपनीची मोटारपंप कि. १३,०००/—रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चानमारा येथुन चोरून नेला असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहे.

**२) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक २३/०७/२०१६ रोजी १३.३० वा. ते १७.३० वा. दर. फिर्यादी विकास वासुदेव गायधने वय ४७ वर्ष रा. समर्थ नगर लाखनी हे शिक्षक पतसंस्थे समोर आपली होन्डा युनीकॉन १६० मोटार दृ सायकल क्र. एमएच ३६ यु ५८३६ कि. ६०,०००/—रू. ची ठेवुन शिक्षक पतसंस्थेची सभा आटोपुन घरी जाण्यासाठी मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी परत आले असता कोणीतरी अज्ञात चोराने पांडे महल समोर शिक्षक सहकारी पतसंस्था भंडारा येथुन मोटार सायकल चोरून नेल्याचे दिसुन आले. असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**३) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे, एक गंभीर जखमी . :—**

दिनांक २३/०७/०१६ रोजी १६.३० वा. दर. अविनाश सुरेश भुवर वय ४५ वर्ष, रा. देशबंधु वार्ड भंडारा यांचा मुलगा जखमी क्रीश अविनाश भुवर वय ११ वर्ष रा. देशबंधु वार्ड भंडारा हा किराणा दुकानातुन सामान घेवुन घराकडे पायी परत येत असतांना यातील अज्ञात मोसा. चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन जखमीस धडक दिली. व त्याचा उजवा पाय फॅक्चर करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—

दिनांक २५/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, तुमसर, व भंडारा येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी दारू कि. १,८००/रु. तसेच जुगारातुन कि. १,१८०/— रु. असा एकुण कि. २,९८० /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.